न्यायालयीन प्रकरण/कायमर्यादा
ईमेलव्दारे

क्र. न्यायाप्र २०२०/प्र.क्र.४०/एसएम-६
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
ई-मेल:- sm6.sesd-mh@gov.in
दिनांक :-२६नोव्हेंबर, २०२०

प्रति,

सर्व शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक,
सर्व जिल्हे.

विषय:- शासनाच्या समक्रमांकाच्या दिनांक ०८/५/२०२० च्या शासन निर्णयास मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २६/६/२०२० रोजी अंतरिम स्थगिती दिलेली असल्यामुळे सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने फीस संदर्भात शैक्षणिक संस्थाविरुध्द कारवाई न करण्याबाबत.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.३३/एस.एम.६ दि.०८/५/२०२०.
२) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक २६/६/२०२० रोजीचे अंतरिम स्थगिती आदेश.
३) अतिरीक्त सरकारी वकील, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. GRS/४५०९, दि.२५/११/२०२०.

महोदय,

मार्च,२०२० पासून देशात व राज्यात करोना विषाणूचा (कोविड-१९) मोठया प्रमाणावर प्रार्दूभाव झाला असून या आजाराच्या संसर्गाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. १३/३/२०२० च्या अधिसुचने अन्वये राज्यात साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ ची अंमलबजावणी राज्यात सुरु आहे या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क (विनियमन) अधिनियम २०११ मधील कलम (२१) अन्वये प्राप्त अधिकारान्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदयान्वये प्राप्त अधिकारानुसार शासन निर्णय दि. ०८ मे २०२० अन्वये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला होता -

१) पालकांच्या सोईच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ मधील देय/ शिल्लक फीस वार्षिक/एकदाच न घेता मासिक/ त्रैमासिक जमा करण्याचा पर्याय (Option) दयावा.

२) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी कोणतीही फीस वाढ करु नये.

३) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी जर काही शैक्षणिक सुविधांचा वापर करावा लागला नाही व त्याबाबतचा खर्च कमी होणार असल्यास पालकांच्या कार्यकारी समितीमध्ये (EPTA) ठराव करुन त्याप्रमाणे योग्य प्रमाणात फीस कमी करावी.

४) लॉकडाउन कालावधीत गैरसोई टाळण्यासाठी पालकांना Online फीस भरण्याचा पर्याय (Option) दयावा.

Scanned with CamScanner

०२. शासनाच्या उक्त नमुद दिनांक ८/५/२०२० रोजीच्या शासन निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालय ,मुंबई येथे खालील प्रमाणे याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत.

याचिका क्र.१००,१०१,१०२,१०३/२०२०

१) असोसिएशन ऑफ इंडियन स्कूल व इतर.
२) संत ज्ञानेश्वर माऊली संस्था. --- विरुध्द महाराष्ट्र शासन
३) ग्लोबल एज्युकेशन फाऊंडेशन.
४) कासेगाव एज्युकेशन सोसायटी.

वरील प्रमाणे मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकांच्या अनुषंगाने दि. २६ जून,२०२० रोजी सुनावणी होवून मा.उच्च न्यायालयाने दि. ८ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयास अंतरीम स्थगिती दिली आहे.

०३. मा.उच्च न्यायालयाने शासनाच्या दिनांक ०८/५/२०२० रोजीच्या शासन निर्णयास अंतरिम स्थगिती दिलेली असतांना सुध्दा सदर शासन निर्णयांच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयामार्फत शैक्षणिक संस्थांच्या विरुध्द कारवाई करण्यात येत असल्याची बाब सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आली असता या बाबत मा.उच्च न्यायालयाने तिव्र नाराजी व्यक्त केली असून यामुळे शासनास अवमान याचिकेस तोंड दयावे लागेल.

०४. सबब, शासनाच्या दिनांक ०८ मे २०२० रोजीच्या शासन निर्णयास मा. उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली असल्यामुळे सदर शासन निर्णयात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरुन संबंधित शैक्षणिक संस्थाविरुध्द फीस संदर्भात कोणतीही प्रतिकूल कारवाई करण्यात येऊ नये. दिनांक ०८ मे २०२० रोजीच्या शासन निर्णया संदर्भात काही तक्रारी उदभवल्यास त्याबाबत उपसचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे कडे पत्रव्यवहार करुन प्रथम मार्गदर्शन प्राप्त करुन घ्यावे व त्याशिवाय पुढील कार्यवाही करु नये .

मात्र शैक्षणिक संस्थांच्या अन्य बाबी संदर्भात (दिनांक ०८ मे २०२० रोजीच्या शासन निर्णयात नमूद मुदयांव्यतिरीक्त उदा- भौतिक सुविधेचा अभाव, शासन मान्यता/ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय शाळा अनधिकृतरित्या चालविणे इ.) नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यास कोणताही प्रतिबंध असणार नाही.

०५. सर्व संबंधितांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

आपला,

(सुधीर पं. शास्त्री)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे
३) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत माहितीस्तव अग्रेषित:-

अतिरीक्त सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना त्यांच्या संदर्भ क्र.३ येथील पत्र अनुषंगाने सादर अग्रेषित.

Scanned with CamScanner